१२४७
७/६/१८

दो.क्रं. १००६१७०१८०००१०१७
दि. ३०/०५/२०१८



पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८

(यापुढील पत्र व्यवहारात खालील क्रमांक व दिनांक याचा उल्लेख करावा.)

(जागेच्या वा इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्कांचे संदर्भ लक्षात न घेता अर्जदारास हे संमतीपत्र देण्यात येत आहे.)

## मंजूर रेखांकन व त्यानुसार अनुज्ञेय होऊ शकणा-या बांधकामा बाबतचा दाखला

सदरचा दाखला महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, सन १९६६ ची कलमे ४५ यातील तरतुदीप्रमाणे आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ (जुना मुंबई महानरगपालिका अधिनियम १९४९ ) ची कलमे( सेक्शन्स) २५३ व २५४ यातील तरतुदीप्रमाणे खालील अटीवर देण्यात येत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थापना ११/१०/८२ पिंपरी-४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११०१८
क्रमांक- बी.पी./एफ.पी./रावेत/०१ /२०१८
दिनांक - ०७ / ०६/२०१८

श्री./श्रीमती/ मे.ए.एम. गोरे ॲन्ड असो.
तर्फे प्रो.प्रा. श्री आत्माराम मनोहरराव गोरे

व्दारा ला.आ. श्री.ओमकार वेदपाठक
पत्ता – त्रिमुर्ती २४८/१अ/१, सुदर्शन नगर,
चिंचवड पुणे ३३,

यांना

पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांजकडुन –

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, सन १९६६ ची कलमे ४५ आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलमे ( सेक्शन्स) २५३ व २५४ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सीमेतील मौजे रावेत येथील स नं. ७७/५ पै, येथील अनुज्ञेय होऊ शकणा-या बांधकामा बाबतच्या दाखल्यासाठी दाखला तुम्ही महानगरपालिकेला हा अर्ज दाखल केला तो दिनांक - ३० /०५ /२०१८ रोजी प्राप्त झाला. त्यावरून अनुज्ञेय होऊ शकणा-या बांधकामाबाबतचा दाखला खालील अटींवर देण्यात येत आहे.

१) मंजुर रेखांकनातील अनुज्ञेय चटई क्षेत्र हे प्रस्तावित टी.डी.आर./रस्तारुंदी आरक्षित क्षेत्र/ॲमिनिटी स्पेसचे क्षेत्रासह ) दर्शविले आहे. प्रत्यक्षात या टी.डी.आर. / रस्तारुंदी व ॲमिनिटी स्पेसच्या चटईक्षेत्राचे मोबदल्या बांधकाम अनुज्ञेय करण्यात आलेले नाही. टी.डी.आर. सर्टिफिकेट उपलब्ध करुन रितसर टी.डी.आर. खर्ची टाकल्यावरच व रस्तारुंदी / ॲमिनिटी स्पेस व आरक्षित क्षेत्रासाठी महानगरपालिकाचे नावे ७/१२ उतारा दाखल झाल्यावर त्या क्षेत्राचे बांधकाम अनुज्ञेय करण्यात येईल. तसेच भुअभिन्यासात चटईक्षेत्र मान्य केले, याचा अर्थ त्यांस बांधकाम परवानगी मिळाली असा होत नाही. केवळ भुअभिन्यास मान्य आहे, म्हणुन त्या क्षेत्राचे बांधकाम केल्यास ते अनधिकृत समजुन एम.आर.टी.पी. १९६६, बी.पी.एम.सी. ॲक्ट १९४९ चे संबंधित कलमार्तंगत कारवाई करण्यात येईल. तसेच मिळकतीत त्रयस्थ हितसंबंध निर्माण झालेस, त्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

२) सदरचा दाखला हा अर्जदारास कुठल्याही प्रकारचे बांधकाम सुरु करण्याची परवानगी नसुन अर्जदाराने त्यासाठी स्वतत्रंपणे परवानगी घेणे बंधनकारक राहील.

३) अर्जदाराने सि.टी.सर्व्हे मोजणीनुसार भुखंडाच्या हद्दी कायम करणे आवश्यक राहील.

४) सोबतचा नकाशा व त्यावरील क्षेत्रफळाचा तक्ता हा या दाखल्याचा भाग आहे.

५) सदरचा दाखला ३१००.०० चौ.मी. भुखंड क्षेत्रावर एकुण बांधकाम क्षेत्र (एफ.एस.आय.) ४०३४.९४ चौ.मी. करीता प्रस्तावित आहे.

६) सदरचा दाखला हा मंजुर रेखांकनासह अनुज्ञेय होऊ शकणा-या एकुण बांधकामाबाबतचा दाखला या कारणापुरताच देण्यात येत आहे.

७) सोबतच्या नकाशात दाखविल्याप्रमाणे भविष्यात काम केले पाहिजे.

८) संकल्पित बांधकाम रस्त्याच्या प्रमाण रेषेत येत असल्यास महानगरपालिकेचे अधिकारी सांगतील त्यावेळी सदरकाम स्वखर्चाने आणि बिनतक्रार काढून टाकले पाहीजे.

९) या दाखल्यानंतर पुन:स्वतंत्र बांधकाम परवानगी घेतल्यावर बांधकाम सुरू करताना संबंधीत जागेमध्ये झाडे असल्यास ती वृक्ष प्राधीकरणाची पूर्व परवानगी घेतल्या शिवाय ती तोडू नयेत. अन्यथा कायदेशीर करवाई करण्यात येते याची नोंद घ्यावी.

१०) आपण संबंधीत दाखला हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम२०१२ (जुना मुंबई महानगरपालिका अधिनियम१९४९ ) व महाराष्ट्र प्रादेशीक नगर रचना अधिनियम१९६६मधील तरतुदीस अधिन राहुन देणेत येत आहे.

११) विकास आराखडयातील रस्ता रूंदीने बाधीत क्षेत्र नियमानुसार नगरपालिकेच्या ताब्यात देणे बंधनकारक आहे.

१२) भुखंडाच्या संबंधीत सहामाही अखेरचा कर भरल्याचा करसंकलन विभाग म.न.पा. यांचेकडील दाखला / पावती सादर करण्यात यावी.

१३) मंजूररेखांकनातील खुली जागा विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे नियम क्र. ११.३.१.५ नुसार तरतुदीचे अधिन विकसीत करणे बंधनकारक आहे.

१४) विकास आराखडयातील रस्ता रूंदीने बाधित क्षेत्रनियमानुसार महापालिकेच्या ताब्यात देणे बंधणकारक आहे. रस्तारूंदीने बाधित क्षेत्र म.न.पा चे नावे लावून तसा ७/१२ चा उतारा / सुधारीत मालमत्ता पत्र व मोजणी नकाशा या कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदरहू रस्ता रूंदीने बाधित क्षेत्राचे खडीमुरूमीकरण महापालिकेच्या विनिर्देशाप्रमाणे अर्जदार यांनी स्वत करणे आवश्यक आहे. अथवा महापालिकेच्या त्यावेळेच्या प्रचलित दराने खडीमुरूमीकरणे खर्च करणे आवयश्यक आहे.

१५) प्रस्तुत प्रकरणातील जागेचा मोजणी नकाशा वहीवाटीनुसार असून हद्दीबाबत वाद निर्माण् झाल्यास त्यास म.न.पा. जबाबदार राहणार नाही.

१६) प्रस्तुत प्रकरणातील भुखंडाचे एकत्रीकरण उपविभागणी नगर भुमापण कार्यालयाकडून, त्याप्रमाणे सुधारीत मालमत्तापत्रक व मोजणी नकाशा या विभागाला सादर करणे आवश्यक आहे.

१७) भुखंडा लगतचे पोहोच रस्ता व आसपासचे क्षेत्रातील पाण्याचा निचरा होणे सार्वजनीक आरोग्या चे दृष्टीने आवश्यक आहे. त्यासाठी विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्रमांक ९.१ नुसार योग्य ती उपाय योजना करण्याची उपाय योजना करण्याची सर्वस्वी जबाबदारी विकसक / अर्जदार यांचेवर राहील. अशा प्रकारे पावसाळी पाण्याचा नैसर्गिकरीत्या निचरा होण्यास कोणत्याही प्रकारे बाधा येणार नाही. याबाबची योग्य ती खबरदारी घेणे विकसक / अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील याबाबत संबंधीत गाळे धारक, रहीवासी यांची कोणत्याही प्रकारे तक्रार, कोणत्याही प्रकारे तोषीस लागू देणार नाही या अटीवर सदरहू दाखला देणेत येत आहे.

१८) मा. तहसिलदार यांचेकडून वर्ग १ साठी जमिनीची विनिश्चीती केल्यानंतर व वर्ग २ साठी आवश्यक तो " नाहरकत दाखला" महानगरपालिकेस सादर करावा.

१९) भुखंडावरीलएकुणबांधकामक्षेत्र५०००चौ.मी. पेक्षा जास्त होत असल्यास पिंपरी चिंचवड महानगरपालिका पर्यावरण सेलचा “नाहरकत दाखला” सादर करणे बंधनकारक राहील.

२०) डेंगु चिकन गुन्या मलेरीया इ. डासांची वाढीवर नियंत्रण ठेवणे साठी बांधकामाचे साईट वर साठवलेले पाण्याचे टाक्यांवर झाकण असणे बंधनकाराक आहे. तसेच साठवलेले पाण्याचे टाकीचे परिसरात साचलेले पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था नियमितपणे करणे विकसकावर बंधनकारक राहिल. तसेच सदर ठिकाणी नियमितपणे मलेरिया ऑईल, ऍबेट फवारणी इ. डांस प्रतिबंधक फवारणी नियमितपणे करणेची जबाबदारी बाधकाम व्यवसायिकांवर राहिल.

कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११०१८.

प्रत माहितीसाठी:- १) मा. जिल्हाअधिकारी, पुणे जिल्हा आर.बी.(पुणे माहितीसाठी)
२ ) मा. सहा. आयुक्त करसंकलन विभाग, मुख्य कार्यालय, पिं.चिं.म.न.पा.
३) मा. उपसंचालक नगररचना व विकास विभाग, पिं.चिं.म.न.पा.
४) जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, पुणे.